# जाहीर जन सुनावणीचे इतिवृत्त :

**प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनीकर्म कार्यालय- नाशिक यांनी तहसील कळवण, देवळा, मालेगांव, बागलाण, जिल्हा - नाशिक, महाराष्ट्र येथील मोसम व गिरणा नदी पात्रातील प्रस्तावित चौदा वाळू घाटाचे वाळू / रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणीचे इतिवृत्त**

---

प्रकल्प प्रवर्तक खनीकर्म अधिकारी- नाशिक यांनी तहसील कळवण,देवळा, मालेगांव, बागलाण, जिल्हा नाशिक, महाराष्ट्र येथील गिरणा व मोसम नदी पात्रातील प्रस्तावित १४ (चौदा) वाळू घाटाचे वाळू / रेती उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी बुधवार दिनांक २४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता, मध्यवर्ती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे आयोजित करण्यात आलेली होती.

केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाने मार्च, २०१८ मध्ये Sand Mining Frame Work – 2018 प्रसिध्द केले. त्यामध्ये वाळू / रेती निर्गमित करतांना आवश्यक असणा-या बाबी संदर्भात देशातील काही ठळक राज्यांच्या अभ्यास करुन काही दिशा निर्देशक दिले. तसेच मा. राष्ट्रीय हरीत लवाद (NGT) यांनी O.A.NO. 368 / 2015 दि. १९/०९/२०१८ रोजीच्या आदेशान्वये केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय यांच्याशी समन्वय साधुन Sustainable Sand Mining Guidelines २०१६ व Sand Mining Framework 2018 व 2020 नुसार धोरणात अनुकूल बदल करण्याचे व जन सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४.०९.२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१.१२.२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ६७/२०२५, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/(डब्लुपीसी) /पीएच/बी—२५०९१० - एफटीएस- ०२२४ दिनांक १०.०९.२०२५ अन्वये खालील प्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हा दंडाधिकारी, नाशिक, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी यांच्या पेक्षा कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष

२) प्रादेशिक अधिकारी, - सदस्य
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - संयोजक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक

श्री, प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नाशिक तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे नमुद केले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री. प्रशांत गायकवाड, संयोजक यांनी पुढे असे नमुद केले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक खनीकर्म अधिकारी कार्यालय - नाशिक यांनी तहसील कळवण, देवळा, मालेगांव, बागलाण, जिल्हा नाशिक येथील गिरणा व मोसम नदी पात्रातील प्रस्तावित १४ वाळु घाटांचे वाळु उत्खनां संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

संयोजक यांनी सांगीतले की पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक ०३.१२.२०१९ च्या पत्रानव्ये वाळू घाट प्रकल्पाला पूर्व पर्यावरण अनुमती मिळण्याबाबत पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी बंधनकारक आहे.

संयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पा विषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत/ सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे व त्यांनी दिलेल्या सूचना शासनास कळविणे हा आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जन सूनावणी बाबत सूचना देणे बंधनकारक आहे. अनुषंगाने उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ नाशिक यांनी स्थानिक वृतपत्र मराठी दैनिक सकाळ व टाइम्स ऑफ इंडीया इंग्रजी यात दिनांक २०.०८.२०२५ रोजी जन सुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केली होती .त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पा विषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचनेप्रमाणे वाळूघाटा संबंधिची ठळक वैशिष्ट्ये असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती व मराठी व इंग्रजीत कार्यकारी सारांश माहिती असलेले कागदपत्रे शासनाच्या सूचित कार्यालयात म्हणजे मा.संचालक ,पर्यावरण विभाग, मंत्रालय , मुंबई, मा.जिल्हादंडाधिकारी कार्यालय नाशिक ,सह संचालक (ज.प्र.नि.) मप्रनि मंडळ,सायन पू ,मुख्य कार्यकारी अधिकारी- जिल्हा परिषद, नाशिक, प्रादेशिक अधिकारी ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, उपविभागीय अधिकारी कार्यालय , कळवण, मालेगांव, बागलाण, जिल्हा-नाशिक, तहसीलदार -तालुका कार्यालय कळवण, देवळा, मालेगांव, बागलाण , जिल्हा - नाशिक, ग्रामपंचायत कार्यालये- नाकोडे, अस्वली ता. कळवण, महालपाटणे, लोहणेर-१, सावकी, सावकी-लोहणेर, विठेवाडी, भऊर, खामखेडा, ता. देवळा, धांद्री, जायखेडा, ता. बागलाण, आघार (खु), नरडाणे, पाटणे, येसगांव ता. मालेगांव, जि. नाशिक व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर कार्यकारी सारांश सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आले होते .

संयोजक यांनी सांगितले उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात.

श्री. बाबासाहेब पारधे, अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, नाशिक यांचे संमतीने पर्यावरण विषयक उपाय योजनांसह प्रस्तावित उपक्रमा विषयी माहिती सादरीकरणाव्दारे सादर करण्याचे प्रकल्प प्रवर्तक यांना सूचित करण्यात आले आहे.

श्री. दिपक चव्हाण, प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांसह व प्रस्तावित उपक्रमा विषयी माहिती सादरी करणाव्दारे उपस्थित जनसमूहास खालील मुदयांवर दिली. सदरील १४ वाळु घाटांचे खालीलप्रमाणे माहिती देण्यात आली. सदरील पर्यावरणीय अहवाल पर्यावरण सल्लागार : मंत्रास इनोवेशन अँड सोल्यूशन्स प्रा.लि. नाशिक यांनी तयार केला.

१. प्रस्तावित १४ वाळू घाट, तालुका कळवण, बागलाण, देवळा, मालेगांव

| अ.क्रं. | वाळू घाटाचे नांव / गावाचे नांव | खासरा क्रं. | तालुका | एकुण क्षेत्र | एकुण उत्पादन ब्रास (वार्षिक) |
|---|---|---|---|---|---|
| १. | गिरणा नदीवरील नाकोडे वाळू घाट | १८७, १८८, १९९, २०० | कळवण | १.०८ | ११४५ |
| २. | गिरणा नदीवरील असोली वाळू घाट | ८०, ८१, ८२, ८३ | कळवण | १.७५ | १८५५ |
| ३. | गिरणा नदीवरील धांद्री वाळू घाट | ९, १०, ११, १९, २०, २३, २४, २५, २६, २७, २८, २९ | बागलाण | १.०८ | १९०८ |
| ४. | मोसम नदीवरील जायखेडा वाळू घाट | १२०४, १२०५, १११७, १११६, ११३५, ११६६, ११६२, ८४, ११६३, ८५ | बागलाण | १.०० | १७६६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | गिरणा नदीवरील महालपाटणे वाळू घाट | ५०२, ५०७, ५०९, ५२२, ५५७, ५५६, ५६५, ४१७ | देवळा | ३ | ६३६० |
| ६. | गिरणा नदीवरील लोहणेर-१ वाळू घाट | ९५५, ९५६, ९५७, ९५८, ९७१, ९७२, ९७३ | देवळा | ४.१५ | १०९९८ |
| ७. | गिरणा नदीवरील सावकी (लो) वाळू घाट | २९२, २९६, २९७, २९८, ३०३, ३०४, ३०५, ३२२ | देवळा | १.७ | ३००३ |
| ८. | गिरणा नदीवरील भऊर वाळू घाट | ६४८, ६५०, ६४९/अ, ६४९/ब, ६४६ | देवळा | २.२५ | ४७७० |
| ९. | गिरणा नदीवरील सावकीलोहनेर विठेवाडी वाळू घाट | ३२३, ३४६, ३४७ | देवळा | १.२४ | २६२९ |
| १०. | गिरणा नदीवरील खामखेडा वाळू घाट | ५६, ५७/अ, ५७/ब, ३६, ६२, ३७, ३८, ४२, ४६, ५२, ५३, ५४, ५५ | देवळा | २.२२५ | ३९२१ |
| ११. | गिरणा नदीवरील आघार (खु) वाळू घाट | ७५३, १४०, १४१, १४२, १४७, १४८, | मालेगांव | १.३५ | १६७० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १४९, १५०, १५१, १५२, १५३, २२१ | | | |
| १२. | गिरणा नदीवरील नरडाणे वाळू घाट | २४४, २४९, २४८, २४७, २४६, २२७, २२४, २११, २०७ | मालेगांव | १०५ | ३७१० |
| १३. | गिरणा नदीवरील पाटणे वाळू घाट | ३६० ते ३६३ | मालेगांव | १.५ | १८५५ |
| १४. | गिरणा नदीवरील येसगांव वाळू घाट | १३६, १३७, १५३, १५४, २०९ | मालेगांव | १.१ | १९४३ |

२. ठळक वैशिष्ठे :

खाणकामाची पध्दत : केवळ मनुष्यबळाच्या सहाय्याने खोदकाम केले जाते. यासाठी कुदळ, घमेल, फावडा या सामग्रीचा वापर केला जाईल. तसेच कोरडया नदीपात्रातून उत्खनन केले जाईल.

स्थानीक मनुष्यबळाचा वापर करण्यात येईल.

आवश्यक यंत्रसामग्री / उपकरणे : कुदळ, घमेल, फावडा

वाहतूक : ट्रॅक्टर ट्रॉलीच्या सहाय्याने वाळू घाटापासून साठवणूक क्षेत्रापर्यंत नेले जाईल.

पाण्याची आवश्यकता : धूळ उडू नये (फवारणी), वृक्षारोपण आणि घरगुती वापरासाठी.

सुरक्षा उपाय : कामगारांना सुरक्षा उपकरणाची तरतुद

३. निष्कर्ष :

१. वरील चर्चेनुसार वाळू उत्खननाचा पर्यावरणावर काहीच परिणाम होत नाही, फक्त वाळू वाहतूकी दरम्यान थोडया फार प्रमाणात धूळ निर्माण होईल.
२. विविध प्रदूषक घटकांचा समावेश करण्यासाठी पुरेसे प्रतिबंधात्मक उपाय अवलंबले जातील. स्थानीकांना रोजगांराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातील.
३. वैज्ञानिकरित्या नदी पात्रातील अयांत्रिकी पध्दतीने उत्खनन होत असल्याने नदीचे संरक्षण होईल आणि पूर थांबेल.
४. एकूणच प्रकल्पाचा सामाजिक, आर्थिक वातावरणाच्या विकासामध्ये सकारात्मक आणि महत्वपुर्ण परिणाम आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यावर अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, नाशिक यांनी उपस्थितांना त्यांचे काही पर्यावरण विषयक सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत अशी सुचना केली.

उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक /प्रकल्प सल्लागार/ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणेआहे —

१. श्री. लक्ष्मण पोपट पवार, भऊर यांनी विविध मुदयांवर आपले मत / आक्षेप मांडलेत. तसेच त्यां त्यांचे आक्षेप / मत ग्रामपंचापयत कार्यालय, भऊर, ता. देवळा, जि. नाशिक यांचे दि. २२/०९/२०२५ रोजीच्या पत्रात नमुद केले आहेत. जसे की, गिरणा नदीतून वाळूचा उपसा झाला तर पाणी जिरण्याची प्रक्रिया बंद होऊन भुजल पातळीत घट होऊ शकते. तसेच पिण्यासाठी शेतीसाठी पाणी उपलब्ध न झाल्यास भऊर गावचा परिसर अवर्षण व टंचाई ग्रस्त होऊ शकतो. शासन विकास कामांसाठी तसेच नागरीकांसाठी सुलभतेने वाळू उपलब्ध व्हावी यासाठी वाळू धोरण राबवत असते. परंतु वाळु घाटांमधील लिलावात लिलाव धारक हे सर्व कायदे, नियम, निर्बंध, अटी व शर्ती न पाळता बेकायदेशिरपणे वाळु उत्खन्न करित असतात. वाळू उत्खन्न संबंधी कुठलेही नियम व निकष ते पाळत नसतात त्यामुळे नदी पात्राचे नुकसान होत असते. नदीकाठचे शेत जमीनी, शेतरस्ते, डांबरी रस्ते, पुल खराब होत असतात. नदी काठच्या स्थानीक भागास धोका उत्पन्न होत असतो. नैसर्गीक वाळूसाठी एम-सॅन्ड हा एक उत्तम पर्याय आहे. तरी वरील कारणांचा विचार करुन भऊर येथील वाळू घाटा बाबत पर्यावरण अनुमती देण्यात येऊ नये.

२. श्री. वैभव धर्मा पवार, रा. खामखेडा, ता. देवळा

यांनी नमुद केले की, श्री. लक्ष्मण पोपट पवार, भऊर यांच्या भुमिकेचे समर्थन करतो. खामखेडा ग्रामस्थांचा प्रचंड विरोध असून ग्रामसभेत एकमुखी विरोधी ठराव मंजूर करण्यात आला आहे. ग्रामसभेशिवाय ही प्रक्रिया कशी सुरु केली असा प्रश्न उपस्थित केला. आमचे म्हणणे ऐकुन योग्य निष्कर्ष काढण्यात यावा व प्रक्रिया बंद करण्यात यावी. अन्यथा रक्ताचे पाट वाहिल्याशिवाय राहणार नाहीत. वाळूचे उत्खन्न होऊ देणार नाही. गिरणा नदीतील सिंचनावर परिणाम होऊन तीव्र पाणी टंचाई व नैसर्गीक व पर्यावरणीय बदल उदभवू शकतील. नदीकाठचे प्रस्तावित वाळू घाट लिलावामुळे गावाच्या विकासास अडथळा निर्माण होईल. खामखेडा येथील प्रस्तावित वाळू घाट लिलाव प्रक्रिया रदद करण्यात यावी. वाळू उत्खन्न करतांना कोणतेही नियम पाळले जात नाहीत. शेतकरी देशोधडीला लागेल. शेतक-यांचे प्रचंड नुकसान होणार आहे. आरोग्य संकट उभे राहू शकते. गावात गुन्हेगारी व राजकीय हस्तक्षेप वाढण्यास मदत होईल. वाळू माफीया वाढणार आहेत. फक्त कागदोपत्री नियंत्रण दाखविले जाते. रस्ता व रोजगारा बाबत फक्त आश्वासन दिले जाते प्रत्यक्षात सर्व ठेकेदाराच्या हातात असते. वाळू घाटाचा लिलाव म्हणजे भविष्य विकणे आहे. ग्रामसभेचा विरोध असतांना कार्यवाही करण्यात येत असल्यामुळे निषेध व्यक्त केला.

३. श्री. शशिकांत श्रीधर निकम, रा. विठेवाडी, ता. देवळा, जि. नाशिक

यांनी नमुद केले की, श्री. वैभव पवार साहेबांनी जी परिस्थिती सांगितली तीच विठेवाडीत आहे. तेंव्हाची पाण्याची पातळी आणि आजची पाण्याची पातळी खोल झाली आहे. पुर्वीच खुप नुकसान झाले आहे. माहिती बाबतचा इमेल सरपंच यांना देण्याची सुचना केली. वाळु उपसा करायची प्रक्रिया सुरु होण्याच्या आंत वजन काटा बसविण्यात आला असल्याचे सांगितले. ग्रामपंचायतीने विरोध ठराव मंजूर केल्याचे नमुद केले.

४. श्री. अनिल रामदास आहिरे रा. जायखेडा, ता. बागलाण, जि. नाशिक

यांनी नमुद केले की, वाळू घाट लिलाव करण्याचा आपण जो घाट घालीत आहात तो चुकीचा आहे. नदी खोल गेली तर पाण्याची पातळी खोल जाईल. ग्रामसभेला महत्व आहे तर आम्हाला विश्वासात घ्या. २५ गावांमध्ये प्रशोभक वातावरण आहे त्यामुळे उदयाचा धोका टाळा. सदर वाळू घाट लिलावामुळे जैविक साखळी तुटणार आहे तरी अन्याय करु नका.

५. स्वाभिमानी शेतकरी संघटना, विठेवाडी, ता. देवळा, जि. नाशिक

यांचेवतीने नमुद करण्यात आले की, वाळू उपसा लिलाव झाल्यास शेती – सिंचनासाठी व पिण्यासाठी प्रश्न निर्माण होईल त्यामुळे गिरणा नदीपात्रातील भऊर शीव ते विठेवाडी शीव, विठेवाडी ते लोहणेर शीव पर्यंत हददीत कुठल्याही प्रकारचा वाळू लिलाव ठेका देण्यात येऊ नये.

६. श्री. राजेंद्र दादाजी निकम, रा. विठेवाडी, ता. देवळा, जि. नाशिक

यांनी नमुद केले की, गिरणा नदी आमची आई असून वाळू काढून घाव घालण्याचा प्रयत्न करु नये. सदर प्रक्रिया त्वरीत थांबविण्यात यावी.

जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी नमुद केले की, तुम्हाला डावलून परस्तर निर्णय घेण्यात येणार नाही. तुमचे म्हणणे अहवालात नमुद करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी नमुद केले की, सरपंच, उपसरपंच व उपस्थित सर्वांच्या भावना तीव्र आहेत. तुमचे म्हणणे शासनस्तरावर कळविण्यात येईल. जबरदस्तीने लिलाव करायचा प्रश्न येत नाही. याबाबत शासन निर्णय घेईल. आम्हाला निर्णय घेण्याचा अधिकार नसून तुमचे म्हणणे रेकॉर्डीग करण्यात आले असून सदर सुनावणीचे इतिवृत्त रेकॉर्डीग व इतर कागदपत्रांसह जसे की, प्राप्त झालेले आक्षेपांसह शासनास पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल असे आश्वासित करण्यात येऊन जाहीर सुनावणीचे कामकाज संपल्याचे घोषित केले.

(प्रशांत गायकवाड)
संयोजक,
पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
नाशिक

(लिंबाजी सु. भड)
सदस्य,
पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
नाशिक

(बाबासाहेब पारधे)
अध्यक्ष,
पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, नाशिक

## जाहीर जन सुनावणीचे इतिवृत्त : (लेखी अर्ज प्राप्त)

प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनीकर्म कार्यालय- नाशिक यांनी तहसील कळवण, देवळा, मालेगांव, बागलाण, जिल्हा - नाशिक, महाराष्ट्र येथील मोसम व गिरणा नदी पात्रातील प्रस्तावित चौदा वाळू घाटाचे वाळू / रेती उत्खनन संदर्भात नागरिकांकडून प्राप्त झालेले लेखी अर्ज / तक्रारी / आक्षेप सोबत जोडण्यात येत असून त्याचा संक्षिप्त गोषवारा खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | लेखी अर्ज / तक्रारी / आक्षेप सादर करणा-या व्यक्तिचे / संस्थेचे नांव व पत्ता | संक्षिप्त गोषवारा |
|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत अधिकारी, उपसरपंच, सरपंच, ग्रामपंचायत भऊर, ता. देवळा, जि. नाशिक | गिरणा नदीतून वाळूचा उपसा झाला तर पाणी जिरण्याची प्रक्रिया बंद होऊन भुजल पातळीत घट होऊ शकते. तसेच पिण्यासाठी शेतीसाठी पाणी उपलब्ध न झाल्यास भऊर गावचा परिसर अवर्षण व टंचाई ग्रस्त होऊ शकतो. शासन विकास कामांसाठी तसेच नागरीकांसाठी सुलभतेने वाळू उपलब्ध व्हावी यासाठी वाळू धोरण राबवत असते. परंतु वाळु घाटांमधील लिलावात लिलाव धारक हे सर्व कायदे, नियम, निर्बंध, अटी व शर्ती न पाळता बेकायदेशिरपणे वाळू उत्खन्न करित असतात. वाळू उत्खन्न संबंधी कुठलेही नियम व निकष ते पाळत नसतात त्यामुळे नदी पात्राचे नुकसान होत असते. नदीकाठचे शेत जमीनी, शेतरस्ते, डांबरी रस्ते, पुल खराब होत असतात. नदी काठच्या स्थानीक भागास धोका उत्पन्न होत असतो. नैसर्गीक वाळूसाठी एम-सॅन्ड हा एक उत्तम पर्याय आहे. तरी वरील कारणांचा विचार करुन भऊर येथील वाळू घाटा बाबत पर्यावरण अनुमती देण्यात येऊ नये. |
| २. | कृष्णाई रायडर्स फाऊंडेशन, जायखेडा, ता. बागलाण, जि. नाशिक | परिसरातील विहीरींची पाण्याची पातळी कमी होईल परिणामी शेती धोक्यात येईल. नदीपात्रालगतच गावाला पाणीपुरवठा करणा-या विहिरी आहेत म्हणून त्यांनाही धोका निर्माण होऊ शकतो. जंगली पशू व पक्ष्यांना नैसर्गिक पिण्याचे वाहते पाणी मिळणार नाही तर ते शेतातील फवारणीच्या टाक्यातील पाणी पितील आणि परिणामी त्यांना जिवाला धोका निर्माण होईल. पेय जल स्तोत्राला बाधा होऊन जनजीवन विस्कळीत होईल. आदिवासी बांधवांच्या मासेमारी करुन उपजीविकेला फटका बसेल. |
| ३. | गृप ग्रामपंचायत कार्यालय, वाडीपिसोळ, | वाळू उत्खननाचा लिलाव झाल्यास नदीतील जलस्तर खोल जावून विहीरींची पाणीपातळी खालावेल व शेतजमीनी कोरडवाहू होतील व |

| | | |
|---|---|---|
| | ता. बागलाण, जि. नाशिक | शेतकरी देशोधडीस लागेल. शेती व्यवसाय धोक्यात येवून शेतकरी आर्थिक अडचणित येईल. स्थानिक पातळीवर लिलावधारकावर नियंत्रण नसल्याने वादाचे प्रसंग निर्माण होत असतात. |
| ४. | ग्रामपंचायत कार्यालय जायखेडा, ता. बागलाण, जि. नाशिक | नदी लगतच्या शेत जमिनी पुर्णपणे उध्दवस्त होऊ शकतात. वाळूघाटामधील लिलावात लिलावधारक कायदे नियम, निर्बंध, अटी व शर्ती न पाळता बेकायदेशीरपणे वाळू उपसा करत असतात.वाळू उपसा संबंधी कुठलेही निकष पाळत नसतात. महसुलाच्या लाभापेक्षा पर्यावरणाची हानी जास्त होणार आहे. |
| ५. | वरची आदिवासी वस्ती रहिवासी, जायखेडा | रस्त्यावर खडडे पडून अपघात होवून जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरची आदिवासी वस्ती येथील रहिवास्यांचा मौजे जायखेडा गावाच्या वाळू घाटाच्या लिलावास पुर्णत: विरोध आहे. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. |
| ६. | ईश्वर मळा महादेव मंदिर भक्तगण जायखेडा | नदीपात्रातील रस्ता खराब होऊन येणा-या भाविकांना तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागू शकतो. महादेव मंदिर देवस्थान पंच कमिटी यांचा पुर्णत: विरोध आहे. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. |
| ७. | इदगाह पंच कमिटी, जायखेडा | मुस्लीम बांधवांना सणाच्या दिवशी नदीपात्रातून जाण्यास अडचणींचा सामना करावा लागू शकतो. जायखेडा गावाच्या वाळू घाटाच्या लिलावास इदगाह पंच कमिटी यांचा पूर्णत: विरोध आहे. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. |
| ८. | वरची भिलाटी अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस जायखेडा. | मुलांना अंगणवाडीत येण्यास अडचणींचा सामना करावा लागू शकतो. मौजे जायखेडा गावाच्या वाळू घाटाच्या लिलावास पूर्णत: विरोध आहे. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. |
| ९. | सौ. प्रिया सतीश टिपरे, रा. जायखेडा | मोसम नदीपात्रातील वाळू घाटांचा लिलाव झाल्यास आम्हांवर उपासमारीची वेळ येईल. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. सदर वाळू घाटाच्या लिलावास मौजे जायखेडा गावाचा व माझा पूर्णत: विरोध आहे. |
| १०. | श्री. शिवाजी धर्मा शिरसाठ, रा. जायखेडा. | मोसम नदीपात्रातील वाळू घाटांचा लिलाव झाल्यास आम्हांवर उपासमारीची वेळ येईल. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. सदर वाळू घाटाच्या लिलावास मौजे जायखेडा गावाचा व माझा पूर्णत: विरोध आहे. |
| ११. | श्री. सचिन काशिनाथ ब्राम्हणकार. रा. जाखेडा | मोसम नदीपात्रातील वाळू घाटांचा लिलाव झाल्यास आम्हांवर उपासमारीची वेळ येईल. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा |

| | | |
|---|---|---|
| | | परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. सदर वाळू घाटाच्या लिलावास मौजे जायखेडा गावाचा व माझा पूर्णत: विरोध आहे. |
| १२. | श्री. राजेंद्र पंढरीनाथ जगताप. रा. जायखेडा. | मोसम नदीपात्रातील वाळू घाटांचा लिलाव झाल्यास आम्हांवर उपासमारीची वेळ येईल. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. सदर वाळू घाटाच्या लिलावास मौजे जायखेडा गावाचा व माझा पूर्णत: विरोध आहे. |
| १३. | श्री. शेख चांद शेख नूर. रा. जायखेडा. | मोसम नदीपात्रातील वाळू घाटांचा लिलाव झाल्यास आम्हांवर उपासमारीची वेळ येईल. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. सदर वाळू घाटाच्या लिलावास मौजे जायखेडा गावाचा व माझा पूर्णत: विरोध आहे. |
| १४. | श्री. शंकर संपत गायकवाड रा. जायखेडा. | मोसम नदीपात्रातील वाळू घाटांचा लिलाव झाल्यास आम्हांवर उपासमारीची वेळ येईल. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. सदर वाळू घाटाच्या लिलावास मौजे जायखेडा गावाचा व माझा पूर्णत: विरोध आहे. |
| १५. | श्री. राहूल रामचंद्र पाटील. रा. जायखेडा | मोसम नदीपात्रातील वाळू घाटांचा लिलाव झाल्यास आम्हांवर उपासमारीची वेळ येईल. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. सदर वाळू घाटाच्या लिलावास मौजे जायखेडा गावाचा व माझा पूर्णत: विरोध आहे. |
| १६. | श्री. विष्णू दादाजी साठे. रा. जायखेडा. | मोसम नदीपात्रातील वाळू घाटांचा लिलाव झाल्यास आम्हांवर उपासमारीची वेळ येईल. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. सदर वाळू घाटाच्या लिलावास मौजे जायखेडा गावाचा व माझा पूर्णत: विरोध आहे. |
| १७. | श्री. कैलास नामदेव जगताप. रा. जायखेडा | मोसम नदीपात्रातील वाळू घाटांचा लिलाव झाल्यास आम्हांवर उपासमारीची वेळ येईल. पाण्याचा निचरा न झाल्यामुळे जायखेडा गावाचा परिसर आवर्षण व टंचाईग्रस्त होऊ शकतो. सदर वाळू घाटाच्या लिलावास मौजे जायखेडा गावाचा व माझा पूर्णत: विरोध आहे. |
| १८. | ग्रामपंचायत धांद्री, ता. बागलाण, जि. नाशिक | ग्रामसभा दि. २२/०८/२०२५ प्रोसेडींगवरुन ठरावाची नक्कल, विषय नं. १० गिरणा नदी पात्रातील गौण खनिज उत्खन्न लिलाव होऊ नये बाबत, ठराव नं. १० भविष्यात पाणी टंचाई दुर्भिक्ष निर्माण होऊ नये म्हणून गावातील गिरणा नदीपात्रातील वाळूचा लिलाव करण्यात येऊ नये यासाठी यापूर्वी ग्रामसभेत ठराव झालेला आहे. तरी सर्वानुमते वाळू लिलावाला विरोध दर्शवत सर्व ठराव कायम करण्यास आजची सभा या ठरावान्वये मंजूरी देत आहे. |
| १९. | ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत खामखेडा, ता. देवळा, जि. नाशिक | ग्रामस्थांनी यापुर्वी कधीही वाळू उपसा किंवा उत्खन्नास परवानगी दिलेली नाही. तसेच अनेक ग्रामसभांमध्ये विरोधाचे ठराव झाले आहेत आणि |

| | | |
|---|---|---|
| | | भविष्यातही याप्रकारच्या प्रकल्पांना विरोध ठामपणे असेल. प्रस्तावित वाळू घाट प्रकल्प तसेच वाळू लिलाव प्रक्रिया तात्काळ रदद करण्यात यावी. |
| २०. | स्वाभिमानी शेतकरी संघटना,इंजि. कुबेर दोधा जाधव. कृष्णा निवास, विठेवाडी, ता. देवळा,जि. नाशिक | लिलाव करकफन वाळू उपसा झाल्यास शेती सिंचनासाठी व पिण्यासाठी प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे गिरणा नदीपात्रातील भऊर शिव ते विठेवाडी शिव, विठेवाडी ते लोहरणे शिव पर्यंत हददीत कुठल्याही प्रकारचा वाळू लिलाव ठेका देण्यात येऊ नये. |
| २१. | ग्रामपंचायत अधिकारी , सरपंच, ग्रामपंचायत विठेवाडी (लो), ता. देवळा, जि. नाशिक | गिरणा नदीपात्रातील वाळूचा उपसा झाल्यास पाण्याची पातळी खोल जाऊन विहीरींना पाणी राहणार नाही. त्यामुळे गावाला व जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी इतरत्र भटकावे लागेल व पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण होईल तसेच विठेवाडी व सावकी गावांना जोडणारा पुल हा राफट फाऊंडेशनचा असल्याने पुलाच्या बांधकामास धोका पोहोचू नये यासाठी पुर्वेस १ कि.मी. पश्चिमेस १ कि.मी. पर्यंत कुठल्याही प्रकारे वाळू उपसा करु नये. |
| २२. | ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सावकी (लो), ता. देवळा, जि. नाशिक | गिरणा नदीपात्रातील वाळूचा उपसा झाल्यास पाण्याची पातळी खोल जाऊन विहीरींना पाणी राहणार नाही. त्यामुळे गावाला व जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी इतरत्र भटकावे लागेल व पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण होईल तसेच विठेवाडी व सावकी गावांना जोडणारा पुल हा राफट फाऊंडेशनचा असल्याने पुलाच्या बांधकामास धोका पोहोचू नये यासाठी पुर्वेस १ कि.मी. पश्चिमेस १ कि.मी. पर्यंत कुठल्याही प्रकारे वाळू उपसा करु नये. |
| २३. | ग्रामस्थ, विठेवाडी, ता. देवळा, जि. नाशिक | गिरणा नदीपात्रातील वाळूचा उपसा झाल्यास पाण्याची पातळी खोल जाऊन विहीरींना पाणी राहणार नाही. त्यामुळे गावाला व जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी इतरत्र भटकावे लागेल व पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण होईल तसेच विठेवाडी व सावकी गावांना जोडणारा पुल हा राफट फाऊंडेशनचा असल्याने पुलाच्या बांधकामास धोका पोहोचू नये यासाठी पुर्वेस १ कि.मी. पश्चिमेस १ कि.मी. पर्यंत कुठल्याही प्रकारे वाळू उपसा करु नये. |
| २४. | कान्सर्व्हेशन ॲक्शन ट्रस्ट. ५, सहकार भवन, १ला मजला, एलबीएस रोड, नारायण नगर, घाट कोपर (प),मुंबई = ४०० ०८६ | इआयए नोटीफिकेशनप्रमाणे – २००६ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व त्यांनी मांडलेले मुददे प्रकल्प प्रवर्तक यांचेकडे पुर्ततेसाठी देण्यात येवून पुर्तते संबंधीची खात्री करण्यात यावी. |

पर्यावरण विषयक जाहीर सुनावणी :

सुस्वागतम !

मी प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, नाशिक आज जनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करतो. आज आपण मा. जिल्हाधिकारी, कार्यालय नाशिक यांचे मार्फत प्रस्तावित नाशिक जिल्ह्यातील गिरणा आणि मोसम नदीवरील नाकोडे, असोली ता. कळवण, महालपाटणे, लोहणेर-१, सावकी, सावकी- लोहणेर - विठेवाडी, भऊर, खांबखेडा ता. देवळा, धांद्री, जायखेडा ता. बागलाण, अघार-खुर्द, नरडाणे, पाटणे, येसगाव, ता. मालेगांव, जि. नाशिक असे एकुण १४ वाळु घाटांच्या उत्खनन बाबत पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीसाठी उपस्थित आहोत.

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ व आजतागायत सुधारित अधिसूचना नुसार सदर प्रकल्प "ब" संवर्गात येत असल्याने आजची जनसुनावणी घेण्यात येत आहे.

यासाठी मा. जिल्हाधिकारी, कार्यालय नाशिक यांचे मार्फत म.प्र.नि. मंडळाच्या मुख्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेला होता. त्यास अनुसरून जाहिर सुनावनी घेण्याचे आदेश दि. ११/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाले आहे.

प्रस्तावित प्रकल्पाचा प्रारूप पर्यावरण आघात मुल्यांकन प्रकल्प प्रवर्तक यांनी तयार केलेला असून तो शासनास सादर केलेला आहे.

त्यानंतर मा. जिल्हादंडाधिकारी, नाशिक यांनी दिनांक २४/०९/२०२५ रोजी जाहिर जनसुनावणी घेण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दि. २०/०८/२०२५, २८/०८/२०२५ व २९/०८/२०२५ रोजीच्या दै. सकाळ मराठी व टाईम्स ऑफ इंडीया इंग्रजी वृत्त पत्रामध्ये जाहिर सुनावणीची सूचना प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदर प्रकल्पाचा प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या प्रती

१.मा.संचालक, पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई -२४

२.मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

३.सह संचालक (ज.प्र.नि.) मप्रनि मंडळ, कल्पतरु पाईंट इमारत, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं.०८,

सायन सर्कल सायन (पु)

४.मुख्याधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक

५.प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, उदयोग भवन, पहिला मजला, त्रंबकरोड, आयटीआय

जवळ, सातपूर, नाशिक – ४२२ ००७

६. उप-विभागिय अधिकारी, कळवण, देवळा, बागलाण व मालेगांव, जि. नाशिक

७.तहसिल कार्यालय, कळवण, देवळा, बागलाण व मालेगांव, जि. नाशिक.

८. ग्रामपंचायत कार्यालय, नाकोडे, असोली ता. कळवण, महालपाटणे, लोहणेर-१, सावकी, विठेवाडी-सावकी- लोहणेर ,भऊर, खांबखेडा ता. देवळा, धांद्री, जायखेडा ता. बागलाण, अघार-खुर्द, नरडाणे, पाटणे, येसगाव, ता. मालेगांव, जि. नाशिक.

इ. ठिकाणी जनतेच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या या प्रकल्पाबाबत जनतेच्या जर काही सुचना, टिका-टिप्पणी असतील तर त्या आपण लेखी किंवा तोंडी स्वरुपात जनसुनावणी दरम्यान देवू शकता त्याची नोंद इतिवृत्तामध्ये घेतली जाईल. मंडळाकडे आज अखेर हरकतीतसेच सहमती दर्शवना-या प्रकल्पास समर्थन प्राप्त झालेली आहेत.

मी सांगू इच्छितो की, ही जनसुनावणी समिती केवळ जनतेच्या पर्यावरण विषयक तक्रारी, सूचनांची नोंद घेणार असून प्रकल्प उभारणी बाबत कोणतेही निर्णय ही समिती घेणार नाही,

या जनसुनावणीचा उद्देश जनतेस या प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या उपाय योजना तसेच प्रकल्पासंदर्भात जनतेच्या "टिका-टिप्पणी, तक्रारी, सूचनांची नोंद घेणे हा आहे. तसेच प्राप्त झालेल्या टिका-टिप्पणी, सूचना यांच्या नोंदी घेवून त्या इतिवृत्तासह पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल.

मी सांगू इच्छितो की, ही जनसुनावणी समिती केवळ जनतेच्या पर्यावरण विषयक तक्रारी, सूचनांची नोंद घेणार असून प्रकल्प उभारणी बाबत कोणतेही निर्णय ही समिती घेणार नाही,

तसेच अध्यक्ष तथा मा. जिल्हाधिकारी नाशिक यांच्या मान्यतेने जाहिर जन सुनावनी सुरू करीत आहे.